अ.पा.क व ए.कु.क (ए.कु.मॅ/ए.कु.पु.)
नोंदी स्वाधिकारे कमी करण्यासाठी
विशेष मोहिम राबविणेबाबत.

# जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव

## (कुळकायदा शाखा)

**परिपत्रक क्र.कुळका/1/ई-टपाल/2022/36/56/267 दिनांक** 10/05/2022

वाचले :- 1) मा.जमाबंदी आयुक्त आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांचेकडील अ.शा.पत्र क्र.संगणक/साबा/डिआर/ड-5/स-1/03 दिनांक 16/08/2003

2) मा.जमाबंदी आयुक्त आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांनी त्यांचेकडील परिपत्रक क्र.ई-फेरफार/क्र.रा.स./कावि/22/2017 दिनांक 02/11/2017

---------------------------------000---------------------------------

## परिपत्रक

7/12 संगणकीकरण अंतर्गत ई-फेरफार प्रणाली हा महाराष्ट्र शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. ई-फेरफार प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी शासन व मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रशिक्षण वर्ग आणि कार्यशाळेमध्ये दिलेल्या सुचनांची तंतोतंत अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांनी उपोद्घातातील क्र. 1 नुसार गाव नमुना नं. 7/12 संगणकीकृत करताना LMIS आज्ञावलीमध्ये अ.पा.क व ए.कु.क (ए.कु.मॅ/ए.कु.पु.) नोंदी कशा पद्धतीने घेण्यात याव्यात याबाबत सूचना निर्गमीत करण्यात आल्या होत्या. मात्र गाव नमुना नं. 7/12 वर अ.पा.क व ए.कु.क (ए.कु.मॅ/ए.कु.पु.) अशा नोंदीचा ई-फेरफार नोंदींचा अंमल ई-फेरफार आज्ञावलीमधून घेताना योग्य होत नसल्याने मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांनी उपोद्घातातील क्र. 2 अन्वये सविस्तर सुचना निर्गमीत केल्या आहेत. तरीदेखील सद्यस्थितीत सदर सुचनांची काटेकोर अंमलबजावणी होताना दिसून येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

तसेच गाव नमुना नं. 7/12 वरील एखादा खातेदार सज्ञान झाल्यानंतरही त्यांची नावासमोरील अपाक हा शेरा कमी करण्यात आला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. गाव नमुना नं. 7/12 वरील अ.पा.क व ए.कु.क इ. शे-यांमुळे शेतक-यांना पीककर्ज व शासनांच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचणींचा

सामना करावा लागत असून त्यामुळे नागरीकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. यास्तव गाव नमुना नं. 7/12 वरील अ.पा.क व ए.कु.क (ए.कु.मॅ/ए.कु.पु.) च्या नोंदी कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

| अ.नं. | विशेष मोहिमेमध्ये करावयाची कार्यवाही | नेमून दिलेला दिनांक |
|---|---|---|
| 1 | गाव नमुना नं. 7/12 वरील अ.पा.क व ए.कु.क इ. शेरे शोधून संख्या निश्चित करणे | दि. 10/05/2022 ते दि. 24/05/2022 |
| 2 | एकूक नमूद असलेल्या 7/12 वरील एकूकची नोंद अभिलेखातून घेऊन एकूकमधील सर्व वारसांच्या नावाची नोंद ई-फेरफार प्रणालीत स्वाधिकारे घेण्याची कार्यवाही करणे. | दि. 25/05/2022 ते दि. 08/06/2022 |
| 3 | गाव नमुना नं. 7/12 वरील अपाक नमूद असलेल्या खातेदाराकडून अपाक सज्ञान झाल्याबाबतचा कायदेशीर पुरावा घेऊन नोंद ई-फेरफार प्रणालीत स्वाधिकारे घेण्याची कार्यवाही करणे. | दि. 09/06/2022 ते दि. 23/06/2022 |
| 4 | मंडळ अधिकारी यांनी अपाक व एकुकच्या नोंदी प्रमाणित करणे. | दि. 24/06/2022 ते दि. 08/07/2022 |

वरीलप्रमाणे विशेष मोहिम राबवून आपल्या उपविभागातील/तालुक्यातील गाव नमुना नं. 7/12 वरील अ.पा.क व ए.कु.क (ए.कु.मॅ/ए.कु.पु.) च्या नोंदी कमी करण्याची कार्यवाही मुदतीत करण्यात यावी व सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये दर आठवड्याच्या शेवटच्या दिवशी (शुक्रवारी) माहिती सादर करावी. सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमजबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

**(अभिजित राऊत)**
**जिल्हाधिकारी जळगाव**

प्रत :- उपविभागीय अधिकारी सर्व
प्रत :- तहसीलदार सर्व

## गाव नमुना नं. 7/12 वरील अ.पा.क व ए.कु.क (ए.कु.मॅ/ए.कु.पु.) च्या नोंदी कमी करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याबाबत.

**परिशिट अ**

| अ.नं. | तालुका | अ.पा.क. कमी करण्यासाठी निश्चित केलेल्या 7/12 ची संख्या | एकुक कमी करण्यासाठी निश्चित केलेल्या 7/12 ची संख्या | अ.पा.क. कमी करण्यासाठी फेरफार नोंद घेतलेल्या 7/12 ची संख्या | एकुक कमी करण्यासाठी फेरफार नोंद घेतलेल्या 7/12 ची संख्या | अ.पा.क. कमी करण्यासाठी शिल्लक 7/12 ची संख्या | एकुक कमी करण्यासाठी शिल्लक 7/12 ची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |